नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक: ०८/०४/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.७

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.१४/०५/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे** भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

उपआयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. १५४

उप आयुक्त परिमंडळ क्र.५ कार्यालयाचे नियंत्रणखालील महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी, भवानीपेठ, कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतची **माहे फेब्रुवारी २०२६** ची एकत्रित माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/परि.५/७२, दि.०५/०५/२०२६ रोजीचे पत्र.

विषय क्र. १५५

उप आयुक्त परिमंडळ विभाग क्र. १ यांचे कार्यक्षेत्रातील ढोले पाटील, येरवडा कळस धानोरी, नगररोड, वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयांकडील **माहे मार्च २०२६** चे कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (ज) यांचे जा. क्र.मआ/परि.क्र.१/६५, दि. ०४/०५/२०२६ रोजीचे पत्र.

विषय क्र. १५६

पुणे महानगरपालिका क्षेत्रीय आयुक्त, परिमंडळ क्र.२ कार्यालय अधिनिस्त औंध-बाणेर, शिवाजीनगर-घोलेरोड व कोथरूड-बावधन या क्षेत्रीय कार्यालयांकडील **माहे मार्च २०२६** चे कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (ज) यांचे जा. क्र.मआ/परि.क्र.२/६३, दि. ०४/०५/२०२६ रोजीचे पत्र.

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. १५७

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२६ ते दि.३१/०३/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.१/६४, दि.०४/०५/२०२६ चे पत्र.

विषय क्र. १५८

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०२/२०२६ ते दि.१५/०२/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/७१, दि.०५/०५/२०२६ चे पत्र.

विषय क्र. १५९

दिनांक ०६/०४/२०२६ ते १२/०४/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ४१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/६९, दि.०५/०५/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. १६०

दिनांक ३०/०३/२०२६ ते ०५/०४/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ३८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/७०, दि.०५/०५/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

ठरावान्वये आलेले अभिप्राय

विषय क्र. १६१

मा. परशुराम वाडेकर, उपमहापौर, मा.हिमाली कांबळे गटनेता – RPI व मा. निलेश आल्हाट यांचे दि. ०५/०३/२०२६ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १८८२, दि. ०५/०३/२०२६ वर आलेला मा. नगरसचिव यांचा जा.क्र./९९६ , दि. ०७/०५/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी.

सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

विषय क्र. १६२

महापालिका सहाय्यक आयुक्त येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत स्वच्छतेसाठी ऑउटसोर्सिंग पद्धतीने हद्दीतील झाडणकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्स पैकी सर्व ठेकेदारांचे दर समान असल्याने चिठ्या काढून सोडत काढली असता ठेकेदार मे. प्रियांक एन्टरप्रायजेस यांची शिफारस केली असल्याने यांचेकडून दि.१/४/२०२६ पासून र.रु.११,६८,३९,२८८/- (अक्षरी – अकरा कोटी अडुसष्ठ लाख एकोणचाळीस हजार दोनशे अठ्याऐंशी रुपये फक्त) अॅटपार (०.००% दराने) रकमे पर्यंत काम करून घेण्यास अधिक टेंडर अटी व शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ आदा करणेस व कामाचे बिल आदा करणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत. मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि. क्र. १/६६, दि. ०४/०५/२०२६ चे पत्र.

मागील सभेचे विषय

विषय क्र. १६३

संत तुकाराम माध्यमिक विद्यालय, पाषाण येथे इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मराठी माध्यम विज्ञान, वाणिज्य आणि कला कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/इओ/२०१८, दि. १८/०३/२०२६ चे पत्रावर झालेला मा. शिक्षण समिती ठराव क्र.२ दि.१०/०४/२०२६ विचारासाठी.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा असे दि.०७/०४/२०२६ च्या सभेत ठरले होते)

संकीर्ण

विषय क्र. १६४

पुणे मौजे धनकवडी येथील स.नं.३५/७ या मधून जाणारा चंद्रभागा नगर रोड ते म्हसोबा चौक यांना जोडणारा ९.०० मी.रुंदीचा रस्ता हा कलम २१० अन्वये १२.०० मी.रुंद रस्ताप्रमानरेषा बांधकाम विकास विभागाने सादर केलेल्या नकाशात लाल रंगाने दर्शविल्यानुसार निश्चित करणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/६८ , दि.०४/०५/२०२६ चे पत्र.

विषय क्र. १६५

पुणे पेठ वडगाव खु.स.नं.५८/३, ५८/४ येथील डब्ल्यू – ५ आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्रांचे रोख मोबदला आदा करणेसाठी खालील बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मालमत्ता /७७ , दि.०६/०५/२०२६.

१) पुणे पेठ वडगाव खु.स.नं.५८ मधील ५८/३ व ५८/४ या मिळकतीचे एस.डब्ल्यू-५ आरक्षणाने बाधित ४३२.८३ चौ.मी. एवढ्या क्षेत्राचे मिळकतधारक श्री.सुनिल जगन्नाथ चरवड व अनिल जगन्नाथ चरवड यांना रोख मोबदल्यापोटी र.रु.१,७०,८४,७००/- आदा करणेस तसेच स्टॅम्प ड्युटी आणि रजिस्ट्रेशन फी र.रु.१२,२५,९५०/- पुणे मनपा मार्फत स्वतंत्रपणे भरण्यास असे एकूण र.रु.१,८३,१०,६५०/- इतक्या रकमेचा मोबदला आदा करणेस.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

(टीप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेट्स) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)